हिंगोली.

दिनांक :— २८.०५.२०२०

**प्रेसनोट**

**लोकसेवक गवई, तलाठी, सज्जा घोटा यांनी लाचेची मागणी केल्यावरून गुन्हा दाखल केले बाबात...**

---

पिडीत तक्रारदार यांनी दिनांक २८.०५.२०२० रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो हिंगोली येथे तक्रार दिली होती की, त्यांचे केसापुर शेत शिवारातील गट क्रमांक २९१,२९२,३०२, व ३०७ मधील शेताचा त्यांचे आई व बहिर्णीचे हक्कसोड पत्रा प्रमाणे जमीनीचा फेर त्यांचे व त्यांचे भावाचे नावाने घेवून तसा सातबारा बनवून देण्यासाठी तलाठी गवई, सज्जा घोटा हे ७,०००/—रू. ची लाचेची मागणी करीत आहेत.

त्यावरून दिनांक २८.०५.२०२० रोजी करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान लोकसेवक गवई, तलाठी, सज्जा घोटा यांनी तक्रारदार यांना त्यांचे केसापुर शेत शिवारातील गट क्रमांक २९१,२९२,३०२, व ३०७ मधील शेताचा त्यांचे आई व बहिर्णीचे हक्कसोड पत्रा प्रमाणे जमीनीचा फेर त्यांचे व त्यांचे भावाचे नावाने घेवून तसा सातबारा बनवून देण्यासाठी ७,०००/—रू. ची लाचेची मागणी करून तडजोडी अंती लाचेची रक्कम ५,०००/—रू. ची स्विकारण्यास सहमती दिली. परंतु, सापळा कार्यवाही दरम्यान लोकसेवक गवई यांना संशय आल्याने त्यांनी लाचेची रक्कम स्विकारण्यास नकार दिला.

त्यावरून लोकसेवक गवई, तलाठी, सज्जा घोटा यांचेविरूध्द पोलीस स्टेशन हिंगोली ग्रामीण येथरे गु.र.क्र. २१०/२०२० कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कामगिरी मा. श्रीमती कल्पना बारवकर, पोलीस अधीक्षिका, अॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड, मा. श्रीमती अर्चना पाटील, अपर पोलीस अधिक्षिका, अॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड, व श्री हनुमंत गायकवाड, पोलीस उप अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री नितीन देशमुख यांनी पोलीस निरीक्षक श्रीमती अफुने स.पो.उप.नि. श्री बुरकुले, पोहेकॉ श्री विजयकुमार उपरे, पोना श्री संतोष दुमाने, पोना श्री ज्ञानेश्वर पंचलिंगे, पोना श्री तानाजी मुंढे, पोशि श्री अविनाश किर्तनकार अॅ.क.ब्युरो कार्यालय हिंगोली यांचे मदतीने केलेली आहे.

अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील, तर कृपया अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालयाशी संपर्क साधावा. कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी अॅन्टी करप्शन ब्युरोचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारी बाबत माहिती पाहिजे असल्यास खालील मोबाईल व दुरध्वनीवर संपर्क साधावा. तसेच तक्रारदार यांना तक्रार देण्यासाठी अॅन्टी करप्शन ब्युरो मार्फत मोबाईल अॅप www.acbmaharashtra.net हे सुरू करण्यात आले आहे.

**टोल फ्री क्र.—१०६४,** दुरध्वनी क्र.०२४५६—२२३०५५,

**मोबाईल क्रमांक :—** ८८८७१७९९९, ८१७७८१८८२५ व ८३९०७६१५०३.

Scanned with CamScanner